# 'मिठी'तून जाणार मेट्रो

## बीकेसी स्थानक ते धारावी दरम्यानचा भुयारी मार्ग तयार



**मेट्रो ३**

**पहिला टप्पा :**

■ सारिपूतनगर (आरे) ते बीकेसी उत्तर असा मार्ग डिसेंबर २०२३मध्ये सुरु होणार आहे.

**दुसरा टप्पा**

■ बीकेसी दक्षिण ते कफ परेड असा असून तो डिसेंबर २०२४ मध्ये सुरु होणार आहे.

■ दुसऱ्या टप्प्याच्यावेळी ही मार्गिका मिठी नदी पात्र पार करून धारावी स्थानकावर जाईल.

**म. टा. खास प्रतिनिधी**

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे- सीप्झ या मेट्रो ३ ही मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडणारी भूमिगत मार्गिका आहे. या मार्गिकेवरील बीकेसी स्थानक ते धारावीदरम्यानचा मार्ग मिठी नदीखालून जाणार आहे. त्यासाठी मिठी नदीखालील आकर्षक असा भुयारी मेट्रो मार्ग पूर्णपणे तयार झाला आहे.

मेट्रो ३ या राज्यातील पहिली भूमिगत मेट्रो मार्गिका आहे. मात्र मेट्रोच्या आरे कारशेडला विलंब झाल्यामुळे ही मार्गिका पूर्ण होण्यास वर्षभराचा विलंब झाला आहे. मात्र सध्या या मार्गिकेचे काम वेगाने सुरू आहे. डिसेंबरमध्ये या मार्गिकेचा पहिला टप्पा सुरू होणार आहे. त्यानुसार मार्गिकेचे भुयारीकरण १०० टक्के काम पूर्ण झाले आहे. या मार्गिकेतील बीकेसी ते धारावी हा टप्पा आव्हानात्मक होता. तो यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आला आहे.

बीकेसी ते धारावीदरम्यानची मार्गिका मिठी नदी पात्राखालून जाते. आव्हानात्मक असलेला नदीखालील हा मार्ग आता बांधून पूर्ण झाला आहे.

मेट्रो ३ मार्गिकेचे बीकेसी (प्राप्तीकर कार्यालय) हे स्थानक महत्त्वाचे असेल. या मार्गिकेसाठीचा नियंत्रण कक्ष याच स्थानकात असेल. त्याचवेळी हे स्थानक 'मेट्रो २ ब' मार्गिकेशी संलग्नता देण्यात येणार आहे. अशा महत्त्वाच्या स्थानकातून ही मार्गिका दक्षिणेकडे धारावी, शीतळादेवी मंदिरमार्गे पुढे कुलाब्याला जाते.



भूमिगत स्थानकांची उभारणीही पूर्ण होत आली आहे. बीकेसी व धारावीसह सांताक्रूझ व विद्यानगरी ही स्थानकेही अंतिम टप्प्यात आहेत. यासंदर्भात मुंबई मेट्रो ३ प्रशासनाने आकर्षक व्हिडीओ ट्विट केला आहे.